ePaper

## जखमी शिवसेनेचा मोर्चा आता मोदींकडे; एकनाथ शिंदेंनाही विचारला खरपूस सवाल



| वर्ष - 6 | अंक - 92 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- मुळशी तालुक्यातील दरडप्रवण घुटके गावातील १४ कुटुंबांचे स्थलांतर
- झोपडपट्टीधारकांना 'हक्काचं घर'
- संजय राऊतांमुळे ४०आमदार शिवसेनेतून बाहेर पडले !


www.mahaenews.com | गुरुवार |दिनांक 7 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



मातोश्रीवरून बोलावणे आले तर नक्की जाऊ मात्र एकटे जाणार नाही. उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदे साहेबांना बोलावल तर सर्व सोबत मातोश्रीवर जावू. आमची तर इच्छा आहे आम्हाला उद्धव साहेबांचा फोन यावा आणि आम्हाला मातोश्रीवर बोलवावे. आमची खदखद हि संजय राऊतांवर नव्हती तर विकास कामावरच होती. मात्र ज्या चाळीस आमदारांच्या मतांवर संजय राऊत खासदार झाले त्यांनाच राऊतांनी रेडा, डुक्कर असे म्हटले. संजय राऊत मोठे आणि ज्येष्ठ आहेत. आम्ही छोटे कार्यकर्ते आहोत. - **सुहास कांदे,** आमदार

"ज्यावेळी आपण युद्धाला जातो, तेव्हा घरी काय चाललंय? हे बघून चालत नाही. ही लोकशाहीची लढाई आहे. त्यामुळे आपण पडलो तरी घराकडे जातोय आणि झुकलो तरी घराकडे जातोय. पण आधीच्या काळात मावळे लढाई करायला जायचे, तेव्हा त्यांना बायका ओवाळायच्या, टीळा लावायच्या. तेव्हा परत येण्याची हमी नव्हती. पण बायका म्हणायच्या मर पण पराजित होऊन येऊ नको. आम्हीही असंच गेलो. मरायचं पण हरायचं नाही, जिंकूनच यायचं आणि तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने आम्ही जिंकून आलो." - **शहाजीबापू पाटील,** आमदार



### महापालिका रुग्णालयात शासकीय दराने उपचार

# मनपा रुग्णालयांवर 'कंट्रोल'!

## प्रशासक तथा महापालिका आयुक्त राजेश पाटील यांचा निर्णय

**| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज |**





पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालये आणि दवाखान्यातील वैद्यकीय सेवा सुविधा आणि औषधोपचाराकरीता आता शासन दराप्रमाणे आकारणी केली जाणार आहे. महापालिकेने यासाठी धोरण निश्चित केले असून त्यास प्रशासक राजेश पाटील यांनी मान्यता दिली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे एकुण ८ रुग्णालये आणि २९ दवाखान्यांमधून शहरातील तसेच शहराच्या हद्दीबाहेरील रुग्णांना उपचारार्थ आरोग्य सेवा सुविधा पुरविल्या जातात. यासाठी २०१० साली लागू करण्यात आलेल्या दरपत्रकानुसार सध्या आकारणी करण्यात येत असून अद्यापपर्यंत सुधारीत दर निश्चित केलेले नाहीत. शहरात वास्तव्य असल्याचा पुरावा सादर न करणा-या रुग्णांकडून प्रत्येक वैद्यकीय शिर्षातील आंतररुग्ण बिलामध्ये महापालिकेमार्फ़त सध्याच्या दरानुसार २० टक्के जादा फ़ी आकारली जाते. तसेच ओपीडी रुग्णांच्या बाबतीत वास्तव्याचा पुरावा आवश्यक नसतो, असे महापालिकेचे सध्याचे धोरण आहे. महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्र वैशिवि-२०१७/ प्रक्र।१९१/प्रशा-२ दि २० नोव्हेंबर २०१७ नुसार राज्यातील शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालये आणि दवाखान्यातील औषधोपचार तसेच निरनिराळ्या वैद्यकीय सुविधांसाठी निर्धारीत केलेले सुधारीत दर हे महापालिका रुग्णालये आणि दवाखान्यांकरीता लागू करण्यासाठी महापालिकेने धोरण तयार केले आहे. शहरात वास्तव्य असल्याचा पुरावा सादर न करणा-या रुग्णांकडून प्रत्येक वैद्यकीय शिर्षातील आंतररुग्ण बीलांसाठी शासन दराप्रमाणे आकारण्यात येणा-या दरामध्ये २० टक्के जादा फ़ी आकारणी केली जाईल. शासन दरानुसार निर्धारीत केलेले दर महापालिकेच्या सर्व रुग्णालये आणि दवाखान्यांकरिता लागू करणे तसेच यापुढे वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणा-या सुधारीत दरानुसार कार्यवाही करण्याकामी मान्यता घेणे याबाबतचे आदेश निर्गमीत करण्याचे अधिकार महापालिका आयुक्तांना असणार आहेत.

### ..या नागरिकांना मोफत सुविधा

शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत येणारे केशरी रेशनकार्डधारक नागरिकांना मोफत सुविधा दिली जाईल. मात्र इतर केशरी रेशनकार्डधारक नागरिकांना देण्यात येत असलेल्या मोफत सुविधेबाबतचा आदेश निरस्त करण्यास प्रशासक पाटील यांनी मान्यता दिली. याबाबत सविस्तर आदेश निर्गत करण्याचे अधिकार महापालिका आयुक्त यांना देण्यास देखील प्रशासक पाटील यांनी मान्यता दिली. नव्याने तयार करण्यात आलेल्या धोरणास महापालिका सभेची मान्यता आवश्यक होती. महापालिकेच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखालील सर्व अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि तिची कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी सद्यस्थितीत राज्य शासनाने पिंपरी चिंचवड महापालिकेवर प्रशासक म्हणून राजेश पाटील यांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार प्रशासक पाटील यांनी नवीन धोरणास मान्यता दिली. प्रशासकीय बाबींची पूर्तता झाल्यानंतर हे धोरण लागू केले जाणार असून याबाबत स्वतंत्र आदेश निर्गत करण्यात येणार आहे.

# लोणावळ्यातील भुशी धारण 'ओव्हेरफ्लो'

## पर्यटकांची गर्दी : प्रशासनाकडून काळजी घेण्याचे आवाहन

**| लोणावळा | महाईन्यूज |**

लोणावळा शहरांमधील पावसाळी पर्यटनाचे मुख्य आकर्षण केंद्र असलेले भुशी बुधवारी सकाळी सात वाजता ओव्हरफ्लो झाले. धरण ओव्हरफ्लो झाल्याची बातमी वाऱ्याप्रमाणे शहरात पसरल्याने स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनी भुशी धरणावर वर्षाविहाराचा गर्दी केली होती. मागील वर्षीच्या तुलनेने यावर्षी धरण भरण्यास विलंब लागला असला तरी पर्यटन हंगाम निर्विघ्नपणे जावा अशी अपेक्षा व्यावसायकांनी व्यक्त केली. भुशी धरण हे लोणावळ्यातील पावसाळी पर्यटनाचे मुख्य आकर्षण आहे. लाखो पर्यटक दरवर्षी याठिकाणी भेट देत वर्षाविहाराचा आनंद लुटतात. येणाऱ्या शनिवार व रविवारी याठिकाणी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

**भुशी धरण हे लोणावळ्यातील पावसाळी पर्यटनाचे मुख्य आकर्षण आहे. लाखो पर्यटक दरवर्षी याठिकाणी भेट देत वर्षाविहाराचा आनंद लुटतात. येणाऱ्या शनिवार व रविवारी याठिकाणी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.**



## शॉर्ट न्यूज »

### लोणावळा परिसरातील दुधिवरे खिंडीत दरड कोसळली



।पुणे। महाईन्यूज ।

लोणावळा-पवनानगर रस्त्यावरील दुधिवरे खिंडीत बुधवारी दरड कोसळली. मोठ्या प्रमाणात दगड आणि माती खिंडीतील अरुंद रस्त्यावर पडल्याने अर्धा रस्ता वाहतुकीस बंद करण्यात आला. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.दुधिवरे खिंडीत मोठ्या संख्येने पर्यटक जातात. पवनानगर परिसरातील सर्व गावांना लोणावळ्यात येण्यासाठी दुधिवरे खिंड जवळचा मार्ग आहे. खिडींतील रस्त्यावरुनपर्यटक पवना धरणाकडे जातात. गेल्या २४ तास लोणावळा परिसरात मुसळधार पाऊस झाला. खिंडीतील कपारीतील दगड आणि माती रस्त्यावर पडल्याने रस्ता वाहतुकीस बंद करण्यात आला. सुदैवाने खिंडीतून कोणी जात नव्हते. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. खिंडीतील कपारातील दगड सैल झाले असून नागरिकांनी मावळातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वेळोवेळी तक्रारी केल्या होत्या.

# मुळशी तालुक्यातील दरडप्रवण घुटके गावातील 14 कुटुंबांचे स्थलांतर !

## सामाजिक उत्तरदायित्व निधीतून कंपनीकडून हातभार

।पुणे। महाईन्यूज ।

घाटक्षेत्रात पावसाचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने संभाव्य दरड प्रवण क्षेत्रात समावेश असलेल्या मुळशी तालुक्यातील घुटके गावच्या १४ कुटुंबांसाठी बांधलेल्या तात्पुरत्या निवासी पत्रा शेडच्या घरांमध्ये स्थलांतर केले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांनी या गावाला भेट देऊन कुटुंब आणि पशुधनाच्या स्थलांतरणाची पाहणी केली.

गेल्या तीन-चार वर्षांपासून शहरासह जिल्ह्यात कमी वेळात जास्त पाऊस होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील दरड किंवा भूस्खलन होऊ शकणाऱ्या धोकादायक २३ गावांचे सरकारी, खासगी संस्थांकडून सर्वेक्षण करण्यात आले आहे. या धोकादायक २३ गावांपैकी १५ गावांतील ग्रामस्थांनी माळीणप्रमाणे कायमस्वरूपी स्थलांतर करण्याची मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. याबाबतचे वृत्त 'लोकसत्ता'ने २ जून रोजी प्रकाशित केले होते. या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून मुळशी तालुक्यातील घुटके गावातील ग्रामस्थांच्या स्थलांतराला सुरूवात करण्यात आली आहे. गेल्या वर्षी पावसानंतर या ठिकाणच्या लोकवस्तीच्या वरील डोंगराच्या जमिनीला एक फुटाची भेग पडल्याचे जिल्हा प्रशासनाला कळवण्यात आले होते. त्यानंतर भूवैज्ञानिकांनी तात्काळ या ठिकाणी भेट देऊन पाहणी करून अभ्यास केला. अभ्यासाअंती मूळ ठिकाणाहून जमीन सरकल्याचे आढळून आले. तसेच पावसादरम्यान या भेगेतून पावसाचे पाणी पाझरून जमिनीखाली कठीण खडकाच्यावरून आणि घरांच्या पायाखालून वाहत असल्याचेही निदर्शनास आले. ही बाब लोकवस्तीला धोकादायक असल्याने गेल्यावर्षी तेथील कुटुंबांना तात्पुरत्या स्वरूपात जिल्हा परिषदेने बांधलेल्या सभामंडपात स्थलांतरीत केले होते.



### मुलभूत सुविधा

फियाट इंडिया प्रा. लि. च्या सहकार्याने प्रत्येकी दोन खोल्यांची १६ पत्र्याच्या शेडची निवारा केंद्रे बनवण्यात आली असून त्यासाठी गावचे सरपंच श्रीराम वायकर यांनी जमीन दिली आहे. याव्यतिरिक्त पुणे जिल्हा परिषदेने या कुटुंबांच्या पशुधनासाठी गोठे बांधले आहेत. जिल्हा परिषदेने या लोकवस्तीला पाणीपुरवठा करण्यासाठी आठ लाख खर्चून पाणीपुरवठा योजना उभारली असून सौरदिवे तसेच अन्य मूलभूत सोयीसुविधा पुरवल्या आहेत. गॅस सिलिंडर, शेगडीही देण्यात आली असून करोना काळजी केंद्रांमधील खाटा, तसेच न वापरलेल्या नवीन गाद्याही या प्रत्येक कुटुंबांना देण्यात आल्या आहेत, असेही जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# जोमाने कामाला लागा, शिरुरचा लवकरच दौरा!

## शिवाजीराव आढळराव पाटील यांनी घेतली उद्धव ठाकरे यांची भेट



पुणे ।महाईन्यूज ।

आपल्यावरील कारवाई नजरचुकीने झाली आहे. पक्षासाठी व मतदारसंघासाठी आपण प्रामाणिकपणे काम केले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपण जोमाने कामाला लागावे. शिरूर मतदारसंघात मी लवकरच दौरा करणार आहे, असे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज शिवसेना उपनेते शिवाजीराव आढळराव पाटील यांना सांगितले.

आढळराव पाटील व जिल्हाप्रमुख शरद सोनवणे यांनी आज 'मातोश्री' येथे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आढळराव पाटील यांचे म्हणणे ऐकून घेतले. शिवसेनेचे काम आपण प्रामाणिकपणे केले आहे. विशेषतः कोरोना काळात आपल्या कामाची दखल राज्य पातळीवर घेण्यात आली. 'निसर्ग' चक्रीवादळाच्या वेळीही आपण मदतीला धावून गेलात. त्यामुळे पुन्हा जोमाने काम करा. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रयत्न करून जास्तीत जास्त शिवसेनेचे उमेदवार निवडून आणा. शिरूर मतदारसंघात लवकरच दौरा करणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. यावेळी शिवसेना नेते सुभाष देसाई, दिवाकर रावते, खासदार संजय राऊत, राहुल शेवाळे, अरविंद सावंत, शिवसेनेचे सचिव अनिल देसाई, आदेश बांदेकर आदी उपस्थित होते.यातून पर्यावरणाची हानी होत असली, तरी पर्यटनस्थळी कचरा, दुर्गंधी, अस्वच्छता आदी प्रकार समोर आल्याने पर्यटनावरही परिणाम होतो. त्यामुळे केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार पर्यटन स्थळांवरही या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार आहे.'

---

## आगरवाडी व राक्षेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना दिला मदतीचा हात....

# श्री एसपी देशमुख शिक्षण संस्थेच्या सचिव रोहिणीताई देशमुख यांनी जोपासली सामाजिक बांधिलकी

## गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके दप्तरे, कपडे व इतर शैक्षणिक साहित्यांचे वाटप

चाकण ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

श्री एसपी देशमुख शिक्षण संस्थेच्या सचिव व विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल, चाकणच्या सीईओ यांच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके दप्तरे, कपडे व इतर शैक्षणिक साहित्यांचे वाटप रोहिणीताई देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. समाजसेवेचा वसा रोहिणीताईंनी पुढे नेत असताना समाजातील सर्व घटकांवर त्यांचे बारीक लक्ष असते. हे त्यांनी आपल्या कार्यातून स्पष्ट केले. समाजातील सर्व स्तरातील लोकांना या सर्व सुविधा मिळाल्या पाहिजेत. हा आग्रह त्या नेहमीच धरत असतात. याच उदात्त हेतूने गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. त्यांच्या या कार्याबद्दल विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांचे आभार मानले. देशमुख कुटुंबाने नेहमीच समाजातील उपेक्षित घटकांच्या मदतीसाठी सदैव तत्पर राहून आपले कर्तव्य बजावतात. यासाठी दरवर्षी विविध उपक्रम राबवले जातात. तसेच शामराव साहेबराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आगरवाडी व राक्षेवाडी या दोन शाळेमध्ये जाऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेतला व त्या शाळेमध्ये शाळेतील शिक्षकांच्या मागणीनुसार आवश्यक शैक्षणिक साहित्य तसेच गरजू विद्यार्थ्यांना कपडे व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना स्वेटर इत्यादी सर्व गोष्टी भेट दिल्या.




> "समाजसेवेचा वसा घेतल्यामुळे तसेच संस्थेच्या सचिव या नात्याने समाजाप्रती आपण देणे लागतो. ही जाणीव सदैव मनात ठेवून मी नेहमी वेगवेगळ्या क्षेत्रात काम करत असताना, समाजातून प्रेम, जिव्हाळा व आपुलकी या सर्व गोष्टी भरभरून मिळत आहेत. यापुढेही मी समाजसेवेचे हे व्रत कायम जोपासणार आहे.
>
> -**रोहिणीताई देशमुख,** सचिव श्री एसपी देशमुख शिक्षण संस्थातथा सीईओ विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल, चाकण

### शाळेच्या वतीने मदतीचा स्वीकार...

गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तू दिल्यानंतर सर्व चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर असलेला आनंद पाहून सर्वच उपस्थित भारावून गेले. सदर कार्यक्रमास विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल चाकणच्या प्राचार्या स्वाती रणदिवे व विद्यानिकेतन स्कुल, चाकणचे प्राचार्य दीपक शिंदे तसेच दोन्ही शाळांतील शिक्षक वृंद व कर्मचारी उपस्थित होते. सर्व शिक्षकांनी शाळेच्या वतीने उपस्थित पाहुण्यांचा सत्कार व सन्मान केला. तसेच त्यांनी दिलेल्या मदतीचा स्वीकार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## शॉर्ट न्यूज

### ईमेल आयडी बदलून कंपनीला घातला एक कोटींचा गंडा

पिंपरी चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी ।

कंपनीचा मेल आयडी आणि बँक खात्याचा तपशील बदलला असल्याचा ईमेल करून कंपनीची ९७ लाख १७ हजार २९४ रुपयांची फसवणूक केली. भोसरी येथील अँफेनॉल इंटरकनेक्ट इंडिया प्रा. लि. या कंपनीत २४ ते २७ मे या कालावधीत ही घटना घडली. कमलेश दत्तात्रय क्षिरसागर (वय ३३, रा. राजगुरूनगर, ता. खेड) यांनी याप्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञाताच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे अँफेनॉल इंटरकनेक्ट इंडिया प्रा ली या कंपनीत अकाऊंट असोसिएट्स ऑफिसर पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या कंपनीचे मुख्य कार्यालयाचा ईमेल आयडी आणि बँक खात्याचा तपशील बदलला असल्याचा ईमेल आरोपीने केला.तसेच यापुढील आर्थिक व्यवहाराबाबत नवीन ईमेल आयडीचा वापर करावा, असे आरोपीने ईमेलमध्ये नमूद केले. फिर्यादीने कंपनीच्या कार्यालयाकडे देणे असलेले एकूण रक्कम ९७ लाख १७ हजार २९४ रुपये आरोपीने पुरवलेल्या बँक खात्यावर पाठवले.

### स्थानिक लाभार्थ्यांसह सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रकल्पाचे स्वागत

# झोपडपट्टीधारकांना 'हक्काचं घर'!

### खंडेवस्ती येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातून 924 सदनिकांची होणार निर्मिती

। पिंपरी । महाईन्यूज ।

औद्योगिक नगरी... कामगार नगरी... बेस्ट सिटी... आणि आता स्मार्ट सिटी... अशी यशस्वी वाटचाल करणारे पिंपरी-चिंचवड शहर आता 'झोपडपट्टीमुक्त' होणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून यासाठी पुढाकार घेतला जात आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'स्मार्ट सिटी' घडत असतानाच शहरात सुरू असलेल्या 'एसआरए'प्रकल्प सामान्य नागरिकांची जीवनशैली सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्रात डिसेंबर १९९५ च्या विधानसभा अधिवेशनामध्ये महाराष्ट्र शासनाने अफझूलपूरकर समितीच्या शिफारशी मान्य करुन महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मध्ये दुरूस्ती केली.

त्याआधारे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सदस्यांचा समावेश असलेले झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापन करण्यात आले. वास्तविक, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. यापैकी १४.७८ टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत वास्तव्य करते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी धोरणानुसार झोपडपट्टी वासियांना आवश्यक त्या सोयी सुविधा युक्त मोफत घर /सदनिका उपलब्ध करून देऊन त्यांचे राहणीमान व जीवनमान उंचावणे व शहर झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी एक प्रभावी अभियान ही काळाची गरजआहे.




> संपूर्ण आयुष्य झोपडीत राहून जगलो. आता आमच्या मुलाबाळांना हक्काचे घर मिळणार आहे. आमच्या लोकांचे जीवनमान उंचवण्यासंदर्भात प्रशासनाने चांगला निर्णय घेतला आहे. मुलांसाठी खेळाचे मैदान, धार्मिक प्रार्थना स्थळही या ठिकाणी होणार आहे. घाणीचे सम्राज्य संपणार असून, आम्हाला चांगली जीवनशैली अनुभवयाला मिळेल. याचे समाधान वाटते.
>
> - **रविकुमार कनोजीया,** झोपडीधारक.

#### झोपडीधारकांचा फायदा काय?

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या माध्यमातून खंडेवस्ती येथील झोपडीधारकांना काय फायदा होणार? हे पाहणे तितकेच महत्त्वपूर्ण आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, ज्या व्यक्तींच्या जागेवर घर आहे. त्या व्यक्तीला घर मिळणार आहे. तसेच, ज्या व्यक्तीचे दुकान आहे, अशा लाभार्थींना दुकान मिळणार आहे. राज्य शासनाच्या जीआरप्रमाणे लाभार्थींना ४२० चौरस फूट म्हणजेच कार्पेट एरिया ३०० चौरस फुटाचे घर मिळणार आहे. हा प्रकल्प खंडेवस्ती म्हणजे ज्या ठिकाणी झोपडपट्टीतील नागरिक राहतात त्याच ठिकाणी होणार आहे.

#### नागरिकांना सतर्कतचे आवाहन...

खंडेवस्ती येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला व्यक्तीगत फायद्यासाठी विरोध किंवा चुकीची माहिती देवून नागरिकांनी दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'एसआरए'मध्ये ज्या झोपडपट्टीवासीयांची नोंद झालेली आहे. त्यांची यादी खंडेवस्ती मुख्य चौकात दर्शनी भागात लावली आहे. या प्रकल्पाबाबत चुकीची माहिती देवून पैशाची मागणी करण्याचा प्रयत्न होतो. त्याला बळी पडू नये, असे आवाहन काही सूज्ञ नागरिक करीत आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत खंडेवस्ती, भोसरी येथील सुमारे ३ हजार नागरिकांना दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पांतर्गत ९२४ सदनिकांची निर्मिती होणार आहे. लाभार्थी कुटुंबाचे सव्हेक्षणही अंतिम टप्प्यात आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अर्थात एसआरएच्या नियमावलीनुसार, लाभार्थी नागरिकांना ४२० चौरस फुटाचे घर देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पासाठी परिसरातील खंडेवस्ती पुनर्वसन विकास समिती, ओमशक्ती प्रतिष्ठान, मस्जीद सिद्धीकी अकबर ट्रस्ट, धम्मचक्र मित्र मंडळ, खंडेवस्ती गणेश मंडळ, धम्मचक्र महिला मंडळ, बी. बी. फातिमा महिला बचत गट अशा संस्था, संघटनांनी एकोप्याने पुढाकार घेतला आहे.

---

# डॉ. मुखर्जी यांचे कार्य प्रेरणादायी : आमदार लांडगे

## पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे जयंतीनिमित्त अभिवादन

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

भारतीय जनसंघाचे संस्थापक आणि आमचे प्रेरणास्थान श्रद्धेय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी देशातील नव्या पिढीला एकात्मतेचा विचार दिला आहे. भारतीय राजकारणातील एकप्रज्ञावंत शिक्षणतज्ञ, प्रखर राष्ट्रभक्त, ओजस्वी वक्ता, कुशल संघटक असे त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. मुखर्जी सदैव प्रेरणादायी राहतील, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या. पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार उमाताई खापरे, माजी महापौर माई ढोरे, राहुल जाधव, नितीन काळजे, प्रदेश चिटणीस अमित गोरखे, नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, विजय फुगे, उत्तम केंदळे, केशव घोळवे, उपाध्यक्ष प्रकाश जवळकर, शेखर चिंचवडे , अनिल लोंढे, नंदकुमार दाभाडे, चिटणीस देवदत्त लांडे, कुलदीप परांडे, अनु. जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष मनोज तोरडमल, मंडल अध्यक्ष, महादेव कवितके, राजेंद्र लांडगे, विनोद तापकीर, योगेश चिंचवडे, महेंद्र बाविस्कर, माजी नगरसेवक हर्षल ढोरे, कुंदन गायकवाड, सागर गवळी, माउली थोरात,विनायक गायकवाड, बाळासाहेब ओव्हाळ, विकास डोळस, राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, सुजाता पालांडे, सारिका लांडगे, संदीप कस्पटे, सागर अंगोळकर, शारदा सोनावणे, संगीता भोंडवे,आरती चोंधे, सुनीता तापकीर, मनीषा पवार, सविता खुळे, निर्मला कुटे, शैलेश मोरे, अभिषेक बारणे, बाबा त्रिभुवन, सिद्धेश्वर बारणे, दिनेश यादव, संतोष मोरे, देविदास पाटील, विठ्ठल भोईर, संदीप गाडे,प्रदीप पटेल, जवाहर ढोरे, राज तापकीर, कृष्णा भंडलकर, मुकेश चुडासमा, प्रमोद पवार, सुभाष सरोदे, शिवदास हांडे आदी उपस्थित होते.



आमचे प्रेरणास्थान श्रद्धेय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी देशातील नव्या पिढीला एकात्मतेचा विचार दिला आहे. भारतीय राजकारणातील एकप्रज्ञावंत शिक्षणतज्ञ, प्रखर राष्ट्रभक्त, ओजस्वी वक्ता, कुशल संघटक असे त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. मुखर्जी सदैव प्रेरणादायी राहतील, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.

## संपादकीय »

# नुपूरने माफी मागावी, पण काळ सोकावतोय !

***भाजपच्या माजी प्रवक्त्या नुपूर शर्मा या बेडर आणि बेधडक, निडर महिला म्हणून ओखळल्या जातात. त्यातून त्या अनेकवेळा वादही ओढवून घेतात, पण यावेळी त्यांनी मोहम्मद पैगंबर यांच्याविषयी विधान करत जगभरातील मुस्लीम राष्ट्रांचा रोष ओढवून घेतला आहे.***

नुपूर यांच्या मागे मोदी व अमित शहा नेहमीच खंबीरपणे उभे राहिले होते, पण धर्माच्या या युद्धात त्या एकट्या पडल्या आहेत. यापुढे त्यांना बोलताना भान राखावेच लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे त्या आता केव्हा जाहीर माफी मागणार आणि काय बोलणार याकडे देशाचेच नाही तर जगाचे लक्ष लागले आहे. नुपूरने माफी मागावी, पण भारतात तालिबानी काळ सोकावतोय, हे धोकादायक आहे.

मोहम्मद पैगंबर यांच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी करणाऱ्या भाजपच्या माजी प्रवक्त्या नुपूर शर्मा यांचे समर्थन केल्याने चार दिवसांपूर्वी राजस्थानमधील उदयपूर येथे कन्हैया लाल या टेलरची गळा चिरुन हत्या करण्यात आली. या घटनेने देशभरात खळबळ उडाली असून गुन्हेगारांना फासावर लटकवण्याची मागणी होत आहे. एकीकडे हा गोंधळ सुरू असतानाच सर्वोच्च न्यायालयाने देशात निर्माण झालेल्या या परिस्थितीसाठी नुपूर शर्माच जबाबदार असल्याचं मत व्यक्त केलं आहे. त्याचबरोबर नुपूर यांनी संपूर्ण देशाची जाहीर माफी मागावी असे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा मान राखत देशात शांतता नांदावी यापोटी नुपूर आज ना उद्या देशवासियांची माफीही मागतील यात शंका नाही. पण नुपूर आणि कन्हैया लाल यांच्यानिमित्ताने विरोधात बोलणाऱ्यांचे तलवारीने गळे चिरणाऱ्या समोर आलेल्या तालिबानी मानसिकतेचं काय?

ही अराजक मानसिकता देशात अचानक कशी आणि कुठे रुजायला लागली आहे ? कन्हैया हत्याकांडाचा व्हिडीओ करत त्यात आम्हीच हे कृत्य करत असल्याच्या कबुलीबरोबरच थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धमकी देणाऱ्या या गुन्हेगारांच्या पाठीशी कोण आहे? कोणाच्या पाठबळावर ते याच देशात राहून थेट भारताच्या पंतप्रधानांना जीवे मारण्याची धमकी देत आहेत हे पाहणंही आता गरजेच झालं आहे. नुपूर यांनी एका चॅनेलच्या चर्चासत्र कार्यक्रमात मोहम्मद पैगंबर यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केलं. त्यानंतर देशातच नाही तर जगातील जवळजवळ सगळ्याच इस्लामिक राष्ट्रांनी याचा निषेध केला. काहींनी नुपूरला जेलमध्ये टाकण्याची मागणी केली. तर कट्टरपंथीय दहशतवादी संघटनांनी तिला ठार मारण्याचा फतवा काढला. पैगंबरांचा अवमान केल्याने नुपूर यांना भारतातूनच नाही तर सौदी अरबियापासून पाकिस्तान, बांग्लादेश या देशांमधून बलात्कारापासून ठार मारण्यापर्यंत धमक्याही देण्यात येत आहेत. नुपूर या भाजपच्या प्रवक्त्या होत्या. यामुळे सहाजिकच हिंदुत्वाच्या मुद्यावर चालणाऱ्या या पक्षाच्या व्यक्तीने जर दुसऱ्या धर्मावर किंवा संबंधित धर्माच्या व्यक्तीवर आक्षेपार्ह वक्तव्य केलं तर वणवा हा पेटणारच.



## आनंदी सकाळ

### परमार्थात नियम थोडाच करावा, पण तो शाश्वताचा असावा

ज्या झाडाची वाढ व्हावी असे आपल्याला वाटते, त्या झाडाला आपण पाणी घालतो, त्याची मशागत करतो, त्या झाडाकडे लक्ष पुरवितो, परंतु जे झाड वाढू नये असे वाटते किंवा ज्या झाडाचे विशेष महत्त्व आपल्याला वाटत नाही, त्या झाडाकडे आपण दुर्लक्ष करतो. तसे, जेणेकरून परमेश्वराच्या ठिकाणी बुद्धी स्थिर होईल, त्याची जोपासना करावी. देहाकडे, विचारांकडे, विषयांकडे दुर्लक्ष करावे, म्हणजे आपोआपच त्यांचा विसर पडेल. ज्याप्रमाणे एखाद्या झाडाची जोपासना करताना, त्याला गुराढोरांनी खाऊ नये म्हणून त्याच्याभोवती कुंपण घालावे लागते, त्याप्रमाणे परमार्थ हा खरा कुंपणातच ठेवावा; तो जितका गुप्त राहील तितका चांगला. त्याचे प्रदर्शन झाले तर त्याला दृष्ट लागते. म्हणून परमार्थ हा कोणाच्या न कळत, परंतु अत्यंत आवडीने करावा. झाड लावल्यावर ते किती वाढले आहे हे कुणी रोज उकरून पाहात नाही, त्याप्रमाणे अनुभवाच्या, प्रचीतीच्या मागे लागू नका; त्यामुळे प्रगती खुंटेल. हट्टी आणि व्यसनी माणसे एका दृष्टीने मला आवडतात; कारण त्यांचा हट्ट भगवंताच्या मार्गाला लावला की झाले.

# अनुभवाचे गोडवे आणि सुसंस्कृतपणा !






महाविकास आघाडी नावाचे लोण्याचे गाडगे गवसल्यावर सत्तेसाठी हपापलेल्या दोन्ही काँग्रेसच्या बोक्याना उद्धव ठाकरे यांच्यात अडीच वर्षात सुसंस्कृत आणि संवेदनशील माणूस दिसायला लागला होता, सत्तेवर नजर असणाऱ्या भाजप नावाच्या बोक्याला शिव्याशाप द्यायचे असल्याने गेली अडीच वर्षे दोन्ही काँग्रेसच्या पुढारी आणि समर्थकांची बुद्धी चरायला गेली होती हे आता लपून राहिले नाही. हे महान लोकशाही रक्षक ज्यांना आदर्शाचा महामेरू समजत होते त्यांची मागची भाषणे जरी ऐकली तरी या सगळ्यांना आपल्या सात पिढ्यांचा उद्धार झाल्याचे पुण्य लाभेल एवढी सुसंस्कृत वचने आजवर उद्धव ठाकरे, संजय राऊत यांनी उधळून ठेवली आहेत.

स्वतःच्या पक्षाच्या आमदार,खासदार आणि पुढाऱ्यांना घरगड्याची वागणूक देण्याची ज्यांची परंपरा असते अशांना त्या वागणुकीत काहीच वावगे वाटत नसते तसेच काँग्रेसचे झाले आहे. श्रीमान सुसंस्कृत आपल्या आमदार आणि मंत्र्यांशी गेल्या अडीच वर्षात कसे शालीन वागले ते आता पुढे येत आहे.एकेक बंडखोर आमदार आपापला अनुभव सांगत आहेत. लोकशाही हा शब्द ज्या ठाकरेंना अपमान वाटत होता त्याच शब्दाचे आता त्यांच्याकडून गायले जाणारे गोडवे ऐकले की लोकांचा जीव मळमळत आहे .आता त्यांनी लोकशाहीची अधिक काळजी केली की खुद्द लोकशाहीच कुठेतरी पळून जायची एवढा विनोद उद्धव ठाकरे सध्या करीत आहेत.

एकनाथ शिंदे आणि फडणवीस यांच्या सरकारचे काय होईल ते काळ ठरवेल मात्र मी नाही तर कुणीही नाही असा खुनशी स्वार्थ गेल्या चार दिवसात उद्धव ठाकरे यांच्या शब्दातून व्यक्त होत आहे तो आता सामान्य शिवसैनिकांनी ओळखला पाहिजे.ज्यांनी तुमच्यासाठी प्राण हातावर घेतले,जीवाची पर्वा न करता लढले,जे आयुष्यभर बिन पगारी फुल अधिकारी म्हणून झुंजत राहिले त्यांच्या आया बहिणी काढतांना या संवेदनशील नेत्याला काहीच वाटू नये याची लाज वाटते. ज्या दिवट्याने सेनेची वाट लावली त्या संजय राऊत यांच्यात अजूनही ज्यांना मसीहा दिसत असेल तर जय महाराष्ट्र, करा कष्ट हा मंत्र जपणाऱ्या मराठी माणसाने आताच झोपेतून खडबडून जागे व्हायला हवे.

# देवेंद्र फडणवीसांचा ‘करेक्ट कार्यक्रम’

**महाराष्ट्राच्या राजकारणात धक्कातंत्राची मालिका खऱ्या अर्थाने आता रंगली आहे. राजकारणात अनपेक्षित धक्के कसे बसतात, दिग्गजांनी व्यक्त केलेले अंदाज फोल कसे ठरतात हे दर्शविणारे मासलेवाईक उदाहरण म्हणजे गुरुवारी घडलेल्या राजकीय घटना.**

गुरुवारी दुपारपर्यंत देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आणि एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील, असे बोलले जात असताना फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्रीपदासाठी शिंदे यांचे नाव जाहीर करुन सर्वांनाच धक्का दिला. आपण सरकारचा भाग असणार नाही, असेही त्यांनी पत्रकार परिषदेत जाहीर करुन सत्तेचा रिमोट कंट्रोल मात्र आपल्याच हाती राहील असे स्पष्ट केले. त्यामुळे हा फडणवीस यांचा ‘मास्टरस्ट्रोक’ असल्याचे बोलले गेले. परंतु, लगेचच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी पत्रकार परिषद घेत उपमुख्यमंत्री म्हणून फडणवीस यांनी जबाबदारी घ्यावी अशी केंद्रीय समितीने शिफारस केल्याचे जाहीर केले. त्यानंतर काही क्षणात उपमुख्यमंत्रीपदी फडणवीस यांचे नाव जाहीर झाले आणि फेरबदलाला फार वेळ न देता शपथविधीचा कार्यक्रम सुरू झाला.



महत्वाचे म्हणजे ज्यावेळी शिंदे यांचे नाव मुख्यमंत्रीपदासाठी जाहीर करण्यात आले त्यावेळची फडणवीस यांची देहबोली आणि त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली त्यावेळची देहबोली यात जमीन आसमानचा फरक दिसून आला. फडणवीस यांना उपमुख्यमंत्री करुन त्यांची भाजपने त्यांची पदावनतीच केली आहे. नव्हे त्यांचा ‘करेक्ट कार्यक्रम’ केला आहे. त्यांचे पद्धतशीरपणे पंख छाटण्याचे काम झाले आहे. मुळात गेल्या विधानसभा निवडणुकीवेळी फडणवीस यांनी ‘मी पुन्हा येणार’ म्हणून केलेला प्रचार हा त्यांची महत्वाकांक्षा दर्शविणारा होता. पुन्हा येण्याच्या नादात त्यांनी शिवसेनेशी पंगा घेतलाच; शिवाय सत्ताही गमावली. त्यानंतर पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळण्यासाठी शिवसेनेतून एकनाथ शिंदे यांचा मोठा गट फोडण्यात त्यांनी यश मिळवले. हे सर्व करताना त्यांनी आपला राजकीय अनुभव पूर्णत: पणाला लावला. सर्वच फासे योग्य पद्धतीने पडत असल्याने आता मुख्यमंत्री म्हणून फडणवीस हेच शपथ घेतील अशी अटकळ बांधली गेली. परंतु, प्रत्यक्षात महाराष्ट्राच्या राजकारणात ‘शिंदेशाही’ सुरू व्हावी अशी भाजप श्रेष्ठींची इच्छा असल्याने त्यांनी फडणवीस यांना पद्धतशीरपणे दूर केले. भाजपमध्ये सुसंस्कृतपणा आणि दिलदारपणा असल्याचे यातून दर्शवण्यात आले.

तरीही सत्तेचा रिमोट आपल्याच हाती असेल या भावनेतून फडणवीस यांनी हा ‘सौदा’ही मान्य केला. पण त्यानंतर नड्डांसह राष्ट्रीय कार्यकारिणीने त्यांना उपमुख्यमंत्री म्हणून जबाबदारी देत त्यांना थेट एकनाथ शिंदेंच्या हाताखाली काम करण्यास भाग पाडले

## ।। अभंगवाणी ।।



जेविले ते संत मागें उष्टावळी ।
अवघ्या पत्रावळी करुनी झाडा ॥१॥
सोवळ्या ओंवळ्या राहिलों निराळा ।
पासूनि सकळां अवघ्यां दुरीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### वन सर्वेक्षक १३ हजारांची लाच घेताना सापळ्यात

।नांदेड ।महाईन्यूज ।

आई, भाऊ आणि मित्राच्या शेतामध्ये असलेली सागवानाची झाडे तोडण्यासाठी परवानगी आणि झाडे तोडल्यानंतर आवश्यक परवानग्या देण्यासाठी १३ हजार रुपयांची लाच स्वीकारल्यानंतर उपवनसंरक्षण कार्यालयातील वन सर्वेक्षक गणेश मज्जनवार याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी अटक केली आहे. तक्रारदाराला लाच द्यावयाची नसल्याने त्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधला. १० हजार रुपये लाच देण्याचे ठरल्यानंतर 5 हजार रुपये मज्जनवार यांनी पूर्वी स्वीकारले होते. उर्वरीत पाच हजारामध्ये तडजोड करण्यासाठी तक्रारदार मज्जनवार यांच्याकडे गेले असता त्यांनी वाहतूक परवाना देण्याचे काम वाढले असल्याचे कारण सांगून आणि आणखी तीन हजार रुपये लाचेची मागणी करून एकूण १३ हजार रुपये स्वीकारले. ही कारवाई पोलीस अधीक्षक राजकुमार शिंदे, अपर पोलीस अधिक्षक धर्मसिंग चव्हाण, पोलीस उपअधीक्षक राजेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक समीर शेख यांच्या पथकाने केली..

### आम्ही संजय राऊतांच्या कोणत्याही वक्तव्याला जास्त किंमत देणार नाही.

# संजय राऊतांमुळे 40 आमदार शिवसेनेतून बाहेर पडले !

### पैसे घेतल्याचा पुरावा द्यावा राजकारण सोडुन घरी बसेन, शंभूराज देसाईंचा आरोप

।मुंबई ।महाईन्यूज ।

शिवसेनेतील ४० आमदारांनी पक्षविरोधी भूमिका घेतली आहे. महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडण्याची मागणी या ४० आमदारांनी केली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आमदारांच्या मागणीवर कोणताही निर्णय घेतला नाही.

अखेर आमदारांनी विरोधी भूमिका घेतली. संजय राऊतांमुळे शिवसेनेवर अशी वेळ आली आहे. त्यांच्यामुळेच शिवसेनेतील ४० आमदार बाहेर पडले असा आरोप माजी गृहराज्यमंत्री आणि शिवसेना नेते शंभूराज देसाई यांनी केला आहे. आम्ही गद्दार नसून महाविकास आघाडीतील गळचेपीमुळे उठाव केला असल्याचे शंभूराज देसाई यांनी म्हटलं आहे. शिवसेना नेते



शंभूराज देसाई यांनी शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यावर टीकास्त्र डागलं आहे. राऊतांना महत्त्व देत नाही असेही देसाई म्हणाले आहेत. माध्यमांशी संवाद साधताना शंभूराज देसाई म्हणाले की, संजय राऊतांमुळेच शिवसेना फुटली त्यामुळे त्यांना मी महत्त्व देत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार जे बोलतात ते कधीच खरे ठरत नाही असे म्हणत या दोन्ही दिग्गज नेत्यांवर शंभूराज देसाई यांनी घणाघाती टीका केली आहे.

#### पैसे घेतल्याचा पुरावा दाखवा राजकरण सोडेन

खासदार संजय राऊत यांनी पक्षांमध्ये वेळोवेळी केलेली ढवळाढवळ आणि आमदारांना दिलेली दुजाभावची वागणूक याचं घटनेला विरोध करत 40 आमदार शिवसेनेतून बाहेर पडले आहेत. तसेच पैसे घेतल्यामुळे शिंदे गटात आमदार सहभागी झाले अशी टीका संजय राऊत यांनी केली होती. यावरसुद्धा शंभूराज देसाईंनी प्रतिक्रिया दिली आहे. पैसे घेतल्याचा पुरावा द्यावा राजकारण सोड्न घरी बसेन. आम्ही संजय राऊतांच्या कोणत्याही वक्तव्याला जास्त किंमत देणार नाही.

#### शरद पवारांच्या दाव्यात सत्य नाही

राज्यांमध्ये मध्यवर्ती निवडणुका लागतील असे भाकीत शरद पवार यांनी केलं आहे. परंतु त्यांच्या या वक्तव्यामध्ये सत्य नाही. शरद पवार जे बोलतात ते कधीच पूर्ण होत नाही. अनेकदा याचा अनुभव आलाय असे सांगत शंभूराज देसाई यांनी शरद पवारांवरसुद्धा टीकास्त्र डागलं आहे.

शिवसेना खासदार संजय राऊत यांच्यावर टीकास्त्र डागलं आहे. राऊतांना महत्त्व देत नाही असेही देसाई म्हणाले आहेत. माध्यमांशी संवाद साधताना शंभूराज देसाई म्हणाले की, संजय राऊतांमुळेच शिवसेना फुटली त्यामुळे त्यांना मी महत्त्व देत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार जे बोलतात ते कधीच खरे ठरत नाही असे म्हणत या दोन्ही दिग्गज नेत्यांवर शंभूराज देसाई यांनी घणाघाती टीका केली आहे.

### उद्धव ठाकरेंनी पुन्हा सोबत येण्यास सांगितलं तर जाणार का?- शिंदे



।मुंबई ।महाईन्यूज ।

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे परत या म्हणाले होते असा खुलासा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. यावेळी त्यांनी बंडामागचं कारणदेखील सांगितलं. तसंच सरकारचा रिमोट कंट्रोल नेमका कोणाच्या हाती आहे याचं उत्तरही दिलं. हा बंड देशभरातील मोठी घटना आहे सांगताना सभागृहातील माझं भाषण उत्स्फूर्तपणे होतं. लोकांच्या मनातील भावना आणि जे काही माझ्या मनात साचलं होतं ते सगळं बोलून मन मोकळं केलं असंही त्यांनी सांगितलं. सूरतला जाण्याआधी उद्धव ठाकरेंसोबत बोलणं झालं होतं का? असं विचारण्यात आलं असता त्यांनी सांगितलं की, "मी त्यांच्याशी बोललो आणि चाललो आहे असं सांगितलं. त्यांनी परत या म्हटलं. पण मी त्यांना परत येईन की नाही माहित नाही सांगितलं. कारण मी जेव्हा प्रयत्न केले तेव्हाच विचार केला असता, निर्णय बदलला असता तर ही वेळ आली नसती".

आम्ही पाच वेळा त्यांच्याकडे भूमिका मांडली. पण त्यात यश आलं नाही असंही त्यांनी सांगितलं.

# "फडणवीसांना घोड्यावरून उतरून गाढवावर बसावं लागलं"

## शिवसेना नेते विनायक राऊतांची खोचक टीका

।सांगोला ।महाईन्यूज ।

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर महाराष्ट्रात एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचं सरकार अस्तित्वात आलं आहे. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाले असून उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आली आहे. भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने आदेश दिल्यानंतर फडणवीसांना उपमुख्यमंत्री पदाची सूत्रं हाती घ्यावी लागली आहेत.



विशेष म्हणजे शपथविधी होण्यापूर्वी काही तास आधीपर्यंत देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होतील, असं सर्वांना वाटत होतं. मात्र केंद्रीय नेतृत्वाच्या आदेशामुळे महाराष्ट्रातील सत्तानाट्याला मोठी कलाटणी मिळाली आणि फडणवीसांना उपमुख्यमंत्री पदावर समाधान मानावं लागलं. यामुळे आता राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क लावले जात आहेत. फडणवीसांना अंधारात ठेवून हा निर्णय घेतल्याचा दावाही अनेक नेत्यांकडून करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना नेते विनायक राऊत यांनी फडणवीसांना खोचक टोला लगावला आहे. ओबीसी आरक्षणासाठी महाविकास आघाडीने काय काम केलं? याबाबत विचारलं असता विनायक राऊत म्हणाले, "ओबीसी प्रवर्गाला राजकीय आरक्षण मिळालंच पाहिजे. केंद्र सरकारने जाणूनबुजून इम्पेरिकल डेटा दिला नाही. इम्पेरिकल डेटा दिला असता तर ओबीसी आरक्षण लागू झालं असतं. पण केंद्र सरकारने दुटप्पीपणा केला. संसदीय समितीपुढे एक आणि न्यायालयात वेगळी भूमिका घेतली. ओबीसी आरक्षणाचं श्रेय शिवसेना किंवा महाविकास आघाडीला मिळू नये, म्हणून केंद्राने हा डेटा दिला नाही."

ओबीसी आरक्षणाबाबत पुढे बोलताना विनायक राऊत म्हणाले की, "ओबीसी आरक्षणाचं काम एकनाथ शिंदे यांच्या आकलनापलीकडचे आहे. पण देवेंद्र फडणवीसांना माझी विनंती आहे, की दिल्लीत तुमचं वजन असेल, तर ते वापरा आणि ओबीसीचा प्रश्न सोडवा. पण आता दिल्लीत तुमचं वजन कमी झालं आहे, हे दिसून आलं आहे. तुम्हाला अंधारात ठेवून सर्व निर्णय घेण्यात आले. त्यामुळे तुम्हाला घोड्यावरून उतरून गाढवावर बसावं लागलं, हे तुमचं दुर्दैवं आहे. पण देवेंद्र फडणवीस आणि आम्ही एकत्र काम केलं आहे. त्यांच्या बुद्धीचातुर्याबद्दल आणि अभ्यासाबद्दल मला खूप अभिमान आहे," असंही ते म्हणाले.

शपथविधी होण्यापूर्वी काही तास आधीपर्यंत देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होतील, असं सर्वांना वाटत होतं. मात्र केंद्रीय नेतृत्वाच्या आदेशामुळे महाराष्ट्रातील सत्तानाट्याला मोठी कलाटणी मिळाली आणि फडणवीसांना उपमुख्यमंत्री पदावर समाधान मानावं लागलं. यामुळे आता राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क लावले जात आहेत. फडणवीसांना अंधारात ठेवून हा निर्णय घेतल्याचा दावाही अनेक नेत्यांकडून करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना नेते विनायक राऊत यांनी फडणवीसांना खोचक टोला लगावला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### आग्रा येथील जामा मशिदीत उत्खनन करण्याची नवी मागणी



। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुरातत्व खात्याने आग्रा येथील जामा मशिदीत उत्खनन करावे, अशी विनंती करणारी नवी याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे वकील वरुण कुमार यांनी ही याचिका दाखल केली आहे. त्यामुळे उत्तर प्रदेशमध्ये मंदिर-मशिद वाद पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. याचिकाकर्ते वकील वरुण कुमार यांच्या म्हणण्यानुसार, आग्रा येथील जामा मशिदीच्या पायऱ्यांच्या खाली ठाकूर केशव देवजी यांच्या मंदिराचे अवशेष मिळण्याची शक्यता आहे. वरुण कुमार यांनी यापूर्वीही याच प्रकराची याचिका मथुरा न्यायालयातही दाखल केली होती.

उज्ज्वला योजनावाल्यांना पुन्हा चुलीवर स्वयंपाक करावा लागत असल्याचे चित्र

# स्वयंपाक घरातील गॅस महागला!

“मनमोहन सिंग यांच्या काळात गॅस 450 रुपयांना होता; मोदीजी, आता 1053 रुपयांचा सिलेंडर

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

स्वयंपाक गॅसच्या किंमतीमध्ये पुन्हा ५० रुपयांची वाढ झाल्याने काँग्रेसने या मुद्द्यावरुन केंद्रातील भाजपा सरकारवर टीका केली आहे. “केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या सरकारने एलपीजी सिलेंडरच्या किमतीत ५० रुपयांची वाढ करून सर्वसामान्य जनतेला महागाईचा आणखी एक झटका दिला आहे. या भाववाढीने गॅस सिलेंडर १०५० रुपये झाला आहे. एवढा महाग गॅस घेणे किती लोकांना परवडणार आहे?,” असा सवाल विचारत ‘न खाने दूँगा और न पकाने दूँगा’ हा मोदी सरकारचा नवा नारा बनला आहे, असा टोला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी लगावला आहे.



“मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून महागाईचा आलेख वाढतच आहे. महागाईवर नियंत्रण मिळवण्यात मोदी सरकारला अपयश आले आहे. जीवनावश्यक वस्तुंचे भावही सामान्यांच्या हाताबाहेर गेले आहेत. तर गॅसचा भाव सातत्याने वाढवून आता तो १०५० रुपये झाला आहे. काँग्रेसप्रणित युपीए सरकारच्या काळात २०१४ साली हाच गॅस सिलेंडर ४५० रुपयांना मिळत होता,” असं पटोले यांनी मोदी सरकारवर टीका करताना म्हटलंय. “महागाईची झळ जनतेला बसू नये म्हणून डॉ. मनमोहनसिंह सरकार सबसिडी देत होते पण मोदी सरकारने ही सबसिडीही बंद केली. मोदींच्या कृपेने आता आपल्या जनतेला जगातील सर्वात महाग एलपीजी गॅस खरेदी करावा लागत आहे. नवीन गॅस कनेक्शन घेणे तर सर्वसामान्य जनतेला अशक्य झाले आहे. नवीन कनेक्शनसाठी आता २२०० रुपये मोजावे लागतात त्यासोबत सिक्युरिटीच्या नावाने ४४०० रुपये द्यावे लागतात, रेग्युलेटरही १०० रुपयांनी महाग केला आहे,” असं म्हणत पटोलेंनी मोदी सरकारच्या गॅस इंधन धोरणांवर टीका केली. “उज्वला योजनेखालील ९ कोटी गॅस कनेक्शन दिल्याचे केंद्र सरकारचे आकडे पाहता या ९ कोटीमधील किती लोकांना एक हजार रुपयांचा गॅस परवणार आहे? या योजनेतील लोकांनी पुन्हा गॅस सिलेंडर घेतलेला नाही. उज्वला योजनेच्या नावाखाली गॅस कनेक्शन दिले व त्यांना मिळणारे केरोसिन बंद केले. आता एक हजार रुपयांचा गॅस परवत नाही व केरोसिनही बंद केल्याने पुन्हा चुलीवर स्वयंपाक करावा लागत असल्याचे चित्र आहे,” असा दावा पटोलेंनी केलाय. “देशाची अर्थव्यवस्था रसातळाला गेली आहे, डॉलरच्या तुलनेत रुपया दररोज घसरत आहे. महागाईने जनतेला जगणे कठीण झाले आहे मात्र मोदी सरकार व मोदींच्या मित्रांचे मात्र अच्छे दिन आले आहेत. पेट्रोल डिझेलवरील करातून आधीच २६ लाख कोटी रुपयांची लूट केली असून आता देशांतर्गत तेल उत्पादनावर अतिरिक्त लाभ कर लावून सरकारला नफा मिळणार आहे.

# गडचिरोलीचा पहिला-वहिला पायलट; हितेश सोनटक्केची 'फ्लाईंग ऑफिसर' म्हणून निवड

## केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या सीडीएस परीक्षेत देशातून चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण

देशात मागास जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोलीच्या मातीत जन्म घेतलेला हितेश सोनटक्के हा तरूण आता भारतीय हवाई दलाच्या फायटर प्लेनमधून आकाशात उंच झेप घेणार आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या सीडीएस (कंबाईंड डिफेन्स सर्विसेस) परीक्षेत देशातून चौथ्या क्रमांकाने तो उत्तीर्ण झाला आहे. हैदराबाद येथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर तो हवाई दलात 'फ्लाईंग ऑफिसर' म्हणून रूजू होणार आहे.

हितेशने बी.टेक (सिव्हिल) ही पदवी घेतली आहे. शालेय जीवनापासूनच त्याच्यावर भारतीय वायुसेनेचा प्रभाव होता. बारावीनंतर तो एनडीएची परीक्षाही उत्तीर्ण झाला होता. पण मुलाखतीत त्याला अपयश आले मात्र, त्यामुळे खचून न जाता त्याने बी. टेक. पूर्ण केल्यानंतर सीडीएसची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण करत आपले ध्येय गाठले.

। गडचिरोली महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



चामोर्शी तालुक्यातील मालेर चक येथील हितेश सोनटक्के या तरूणाने आंतराष्ट्रीय पातळीवर आपल्या जिल्ह्याचे नाव नावलौकिक केलं आहे. हितेश हा केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या सीडीएस (कंबाईंड डिफेन्स सर्विसेस) परीक्षेत देशातून चौथ्या क्रमांकाने तो उत्तीर्ण झाला आहे. हैदराबाद येथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर तो हवाई दलात 'फ्लाईंग ऑफिसर' म्हणून रूजू होणार आहे.

देशात मागास जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोलीच्या मातीत जन्म घेतलेला हितेश सोनटक्के हा तरूण आता भारतीय हवाई दलाच्या फायटर प्लेनमधून आकाशात उंच झेप घेणार आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या सीडीएस (कंबाईंड डिफेन्स सर्विसेस) परीक्षेत देशातून चौथ्या क्रमांकाने तो उत्तीर्ण झाला आहे. हैदराबाद येथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर तो हवाई दलात 'फ्लाईंग ऑफिसर' म्हणून रूजू होणार आहे.

हितेशने बी.टेक (सिव्हिल) ही पदवी घेतली आहे. शालेय जीवनापासूनच त्याच्यावर भारतीय वायुसेनेचा प्रभाव होता. बारावीनंतर तो एनडीएची परीक्षाही उत्तीर्ण झाला होता. पण मुलाखतीत त्याला अपयश आले मात्र, त्यामुळे खचून न जाता त्याने बी. टेक. पूर्ण केल्यानंतर सीडीएसची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण करत आपले ध्येय गाठले. भारतीय हवाई दलात अधिकारी म्हणून रुजू होणारा हितेश गडचिरोली जिल्ह्यातील एकमेव तरूण आहे. त्यामुळे तो सर्वांसाठी प्रेरणास्थान ठरणार आहे. हितेश हा चामोर्शी तालुक्यातील मालेर चक येथील प्रतिष्ठित व्यापारी दिवंगत जनार्दन कुकडे यांचा नातू आहे.

चामोर्शी तालुक्यातील मालेर चक या गावात त्याचे वडील मुरलीधर सोनटक्के यांचे मेडिकल स्टोअर आहे. गावात कॉन्व्हेंट स्कूल नसल्याने त्यांनी हितेशला घोट येथील महात्मा गांधी कॉन्व्हेंट स्कूल मध्ये टाकले. चौथ्या वर्गापर्यंत तिथे शिक्षण झाल्यानंतर त्याने दहावी आणि बारावीचे शिक्षण नागपूर येथे घेतले. हितेशला इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९६ टक्के गुण होते. त्यामुळे घरच्यांना हितेशकडून फार मोठ्या अपेक्षा होत्या. जिद्द आणि ध्येय समोर ठेवून बारावीच्या परीक्षेत त्याने अपेक्षित ९७ टक्के गुण प्राप्त करून यशोशिखर गाठले. त्यानंतर पुणे येथील एमआयटी कॉलेजमधून सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी घेतली.

यादरम्यान त्याने एनसीसीच्या एअर विंगमधून 'सी' सर्टिफिकेट परीक्षा ही उत्तीर्ण केली. स्क्रिट शूटिंगमध्ये तो देशभरातील कॅडेट्समध्ये पहिला आला होता. हितेशने सिडीएस आणि एएफसीएटीची परीक्षा दिली. यामध्ये त्याने भारतातून चौथा व महाराष्ट्रातून पहिला क्रमांक मिळवत भारतीय वायुसेनेत 'पायलट' या पदावर नियुक्त झाला. हितेश सोनटक्के गडचिरोली जिल्ह्यातील पहिला पायलट ठरला आहे. हितेश ची पायलट पदावर नियुक्ती झाल्याबद्दल सर्व स्तरावरून अभिनंदन केले जात आहे.

# उर्फी जावेदचा ट्रेडिशनल लुक चर्चेत

उर्फी जावेद तिचे विचित्र कपडे आणि फॅशनमुळे नेहमीच चर्चेत असते. कधी एअरपोर्ट तर कधी स्वतःच्याच घराच्या खाली उर्फी जावेद नेहमीच नव्या लुकमध्ये स्पॉट होते. सोशल मीडियावर तिचे व्हिडीओ आणि फोटो नेहमीच चर्चेत असतात. पण उर्फीला साडी, मांगटीका, कपाळावर टिकली आणि हातात बांगड्या अशा अवतारात फारच कमी लोकांनी पाहिलं असेल. सध्या उर्फी जावेदचा एक व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे. ज्यात ती पारंपरिक लुकमध्ये दिसत आहे.

सध्या सोशल मीडियावर आपल्या विचित्र फॅशनमुळे चर्चेत राहणाऱ्या उर्फी जावेदनं याआधी अनेक टीव्ही मालिकांमध्ये काम केलं आहे. यापैकी एक मालिका आहे, 'ए मेरे हमसफर.' या मालिकेतील एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे आणि या व्हिडीओमध्ये उर्फी जावेद संस्कारी पारंपरिक लुकमध्ये दिसत आहे. तिच्या या लुकचं सोशल मीडियावर खूप कौतुकही होताना दिसत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडीओमध्ये उर्फी जावेदनं जांभळ्या रंगाचा लहंगा परिधान केला आहे. कपाळावर टिकली, मांगटीक आणि हातात बांगड्या घातलेली उर्फी खूपच सुंदर दिसत आहे. व्हिडीओ पाहिल्यानंतर रोज विचित्र फॅशनचे कपडे परिधान करणारी उर्फी जावेद हीच आहे यावर विश्वास बसत नाही. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर उर्फीच्या या लुकचं कौतुक केलं जात आहे.





# इंटिमेट सीनसाठी रणवीरची परवानगी घेते का? दीपिका, म्हणाली...

बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंग हा लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. रणवीर आणि दीपिका पदुकोणची जोडी ही लोकप्रिय जोड्यांपैकी एक आहे. आज रणवीरचा ३७ वा वाढदिवस आहे. रणवीरच्या वाढदिवसानिमित्ताने त्याच्या वैवाहिक जीवनाविषयी जाणून घेऊया. रणवीर आणि दीपिकाचं लग्न २०१८ साली झालं. हे दोघे सोशल मीडियावर एकमेकांसाठी पोस्ट शेअर करताना दिसतात. त्या दोघांच्या लग्नानंतर दीपिकाने अनेक चित्रपटांमध्ये काम केले. पण काही काळापूर्वी दीपिकाचा 'गहराईया' हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात दीपिकाला तिच्या आणि सिद्धांत चतुर्वेदीसोबत दिलेल्या इंटिमेट सीनसाठी रणवीरची परवानगी घेतली होती का असा प्रश्न अनेकांनी सोशल मीडियावर विचारला होता. 'बॉलिवूड बबल'शी बोलताना दीपिका म्हणाली, 'जर यावर मी प्रतिक्रिया दिली तर तो मुर्खपणा ठरेल. मी कधीच कमेंट्स वाचत नाही आणि मला वाटतं रणवीरही अशा कमेंट वाचत नसावा. माझ्या मते असं करणं मुर्खपणा लक्षण आहे. रणवीरबद्दल सांगू तर त्याला माझ्या कामाचा अभिमान वाटतो. माझ्या चित्रपटाचाही त्याला अभिमान वाटेल. या चित्रपटातील माझा अभिनय देखील त्याला आवडला आहे.' दरम्यान दीपिकानं एका मुलखातीत 'गहराइयां' सारखा बोल्ड चित्रपट निवडण्याचं श्रेय पती रणवीर सिंहला दिलं होतं. त्यामुळेच मी एवढी बोल्ड झाले असं ती म्हणाली होती. शकुन बत्रा दिग्दर्शित 'गहराइयां' चित्रपटात अनन्या पांडे, दीपिका पदुकोण, धैर्य कारव आणि सिद्धांत चतुर्वेदी यांच्या मुख्य भूमिका आहेत.

# ऐश्वर्या राय बच्चनचा 'पोन्नियिन सेलवन पार्ट 1' चित्रपटातील पहिला लूक रिव्हिल

बॉलिवूडची ब्यूटी क्वीन ऐश्वर्या राय बच्चन आता पुन्हा एकदा आपल्या नव्या भूमिकेत सज्ज होणार आहे. मणि रत्नमचा आगामी चित्रपट 'पोन्नियिन सेलवन पार्ट 1' या चित्रपटातील ऐश्वर्याचा पहिला लूक रिव्हिल करण्यात आला आहे. हा शेअर करण्यात आलेला लूक पाहून प्रेक्षकांना भूरळ पडली आहे.

नुकतंच या चित्रपटाच्या निर्मात्यांनी ट्वीटर अकाऊंटवर ऐश्वर्या राय बच्चनचा पहिला लूक रिव्हिल केला आहे. तसेच खाली कॅप्शनमध्ये लिहिलंय की, प्रतिशोधाचा एक सुंदर चेहरा, भेटा पझुवूरची राणी नंदिनीला. 'पोन्नियिन सेलवन पार्ट 1' या चित्रपटामध्ये ऐश्वर्याने राणी नंदिनी ही भूमिका साकारलेली आहे. ऐश्वर्याच्या या रिवीज झालेल्या लूकमध्ये तिने केशरी रंगाची रेशमी साडी नेसलेली असून गळ्यात सुंदर हार परिधान केलेला आहे, तर कानात सुंदर झुमके घातलेले आहेत. ऐश्वर्याचा हा लूक पाहून चाहत्यांना भूरळ पडली आहे.



### या दिवशी होणार चित्रपट रिलीज


दिग्दर्शक मणिरत्नम यांचा बहुप्रतिक्षित चित्रपट गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. या चित्रपटात ऐश्वर्या राय बच्चन व्यतिरिक्त साउथ चे दिग्गज कलाकार विक्रम आणि कार्तिक सुद्धा मुख्य भूमिकेत असणार आहेत. ३० सप्टेंबर रोजी हा चित्रपट रिलीज होणार असून हा हिंदी, तमिळ, कन्नड, मल्याळम भाषांमध्ये रिलीज होणार आहे.



# समांथा रुथ प्रभूचं बॉलिवूडमध्ये पदार्पण

साउथ सुपरस्टार समांथा रुथ प्रभूचे देशभरात लाखो चाहते आहेत. तेलगू सिनेसृष्टीत समांथाने मोठी लोकप्रियता मिळवली. त्यानंतर मनोज वाजपेयीसोबत 'फॅमिली मॅन २' या हिंदी वेब सीरिजमधून तिने प्रेक्षकांची मोठी पसंती मिळवली. तर आता समांथा लवकरच एका हिंदी सिनेमामधून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. फिल्म 'पुष्पा: द राइज' सिनेमामधील आयटम सॉन्गमुळे समांथा चांगलीच चर्चेत आली होती. समांथा बॉलिवूडमध्ये कधी पदार्पण करणार याची चाहते आतुरतेने वाट पाहत होते. त्यानंतर आता समांथाने बॉलिवूड सिनेमा साईन केल्याच्या चर्चा आहे. या सिनेमात ती अभिनेता आयुष्मान खुरानासोबत झळकेल असं वृत्त आहे. समांथाचं बॉलिवूडमध्ये पदार्पण बॉलिवूडमध्ये लवकरच समांथाची जादू पाहायला मिळणार आहे. दिनेश विजन निर्मित सिनेमात समांथा झळकणार असल्याचं म्हंटलं जातंय. असं असलं तरी फिल्म मेकर्स आणि समांथाकडून कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

# हिरवागार निसर्ग अन् दाट धुक्यात रमली सई ताम्हणकर, भर पावसात



अभिनेत्री सई ताम्हणकर सोशल मीडियावर फारच सक्रिय असते. चित्रपट, वेबसीरिज असो वा एखादी भूमिका सई याबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसते. शिवाय आपले बरेच फोटो ती शेअर करताना दिसते. व्यग्र वेळापत्रकामधून स्वतःसाठी वेळ काढत सईने पावसाचा आनंद लुटला आहे. यादरम्यानचेच काही फोटो सईने इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे शेअर केले आहेत. सध्या सगळीकडे पावसाचं सुंदर वातावरण निर्माण झालं आहे. घनदाट झाडी, हिरवागार निसर्ग, डोंगराळ भागातून वाहणारे धबधबे सगळ्यांचं लक्ष वेधून घेत आहेत. कलाकार मंडळी देखील या सुंदर निसर्गाच्या प्रेमात आहेत. काही कलाकार मंडळींनी इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे पावसाचा आनंद लुटतानाचे फोटो, व्हिडीओ शेअर केले आहेत. यामध्ये सईचाही नंबर आहे.

## शॉर्ट न्यूज »

### जगभरातील माजी खेळाडू पुन्हा उतरणार क्रिकेटच्या मैदानात

ॲमस्टेलव्हीन । महाईन्यूज

समालोचन किंवा विविध क्रीडा वाहिन्यांवरील कार्यक्रमांच्यानिमित्त निवृत्त झालेले अनेक दिग्गज क्रिकेटपटू आपल्याला नव्याने दिसतात. मात्र, आता या खेळाडूंना पुन्हा मैदानावर उतरण्याची संधी मिळणार आहे. 'लिजेंड्स क्रिकेट लीग' स्पर्धेच्या दुसऱ्या सत्राची घोषणा करण्यात आली आहे. यंदा या स्पर्धेत चार संघ सहभागी होणार असून ११० आंतरराष्ट्रीय खेळाडू खेळताना दिसणार आहेत. वीरेंद्र सेहवाग, इरफान पठाण आणि युसूफ पठाण यांसारखे माजी भारतीय क्रिकेटपटूदेखील लेजेंड्स क्रिकेट लीगच्या (एसएलसी) दुसऱ्या सत्रात खेळताना दिसणार आहेत.

यंदा ही स्पर्धा ओमानमध्ये, २० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. भारताचे माजी प्रशिक्षक आणि लिजेंड्स क्रिकेट लीगचे आयुक्त रवी शास्त्री म्हणाले, "दिग्गजांना पुन्हा मैदानावर उतरण्याची संधी मिळणार आहे.

# सामन्याच्या 'अजब' वेळेमुळे भारतीय चाहत्यांमध्ये नाराजी !

## प्रसारकांनाही बसणार फटका

।पालेकेले । महाईन्यूज ।



भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिका संपली असून उद्यापासून (७ जुलै) टी २० मालिका सुरू होणार आहे. ७ जुलै ते १० जुलै या कालावधी दरम्यान चालणाऱ्या मालिकेमध्ये तीन सामने खेळवले जाणार आहेत. यातील पहिला सामन्याच्या वेळेमुळे भारतीय चाहते नाराज झाले आहेत. याशिवाय, सामन्याचे प्रसारकही याबाबत फारचे समाधानी नसल्याचे चित्र आहे.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिला टी २० सामना गुरुवारी साउथॅम्प्टन येथे खेळवला जाणार आहे. ही टी २० मालिका सुरु होण्यापूर्वी पहिल्या सामन्याची वेळ चर्चेचा विषय ठरली आहे. पहिला सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री १० वाजून ३० मिनिटांनी सुरू होणार. त्यामुळे हा सामना बघण्यासाठी चाहत्यांना साधारण तीन वाजेपर्यंत जागे रहावे लागेल. त्यामुळे जाहिरातदार, प्रसारक आणि भारतीय क्रिकेट चाहते नाराज झाले आहेत.गड्यासाठी २२२ धावांची भागीदारी केली. ऋषभ पंत आणि रविंद्र जडेजाच्या शतकी खेळीमुळे भारताला पहिल्या डावात सर्वबाद ४१६ धावांपर्यंत मजल मारता आली होती. त्यानंतर फलंदाजीसाठी उतरलेल्या यजमान इंग्लंडला सर्वबाद २८४ धावा करणे शक्य झाले होते. जॉनी बेअरस्टोच्या शतकी खेळीमुळे त्यांना फॉलोऑन टाळण्यात यश आले.

या सामन्यात भारतीय संघाचे नेतृत्व जसप्रीत बुमराहकडे देण्यात आले होते. दुसरीकडे, इंग्लंडच्या कसोटी संघालादेखील बेन स्टोक्सच्या रुपात नवीन कर्णधार मिळाला होता. त्यामुळे दोन्ही संघ नवीन कर्णधारांच्या नेतृत्वाखाली खेळत होते. सहसा भारतीय क्रिकेट संघ जे सामने खेळतो ते सर्व भारतीय वेळेनुसार आणि चाहत्यांच्या सोयीनुसार आयोजित केले जातात.

# एकदिवसीय मालिकेत शिखर धवन करणार नेतृत्व

## रोहित शर्मा आणि विराट कोहलीसह वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती

। लंडन । महाईन्यूज ।



सध्या सुरू असलेला इंग्लंड दौरा संपल्यानंतर भारतीय क्रिकेट संघ वेस्ट इंडीज दौऱ्यावर जाणार आहे. तिथे तीन एकदिवसीय आणि पाच टी २० समान्यांच्या दोन मालिका भारतीय संघाला खेळायच्या आहेत. त्यापैकी एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या मालिकेसाठी रोहित शर्माला विश्रांती देण्यात आली आहे. त्यामुळे भारतीय संघाचे नेतृत्व एका शिखर धवन करणार आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आज (६ जुलै) वेस्ट इंडीज विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी संघाची घोषणा केली. त्यानुसार, स्फोटक फलंदाज शिखर धवन भारतीय संघाचा कर्णधार असले तर रविंद्र जडेजाकडे उपकर्णधारपद देण्यात आले आहे. निवडण्यात आलेल्या १६ सदस्यीय संघातून रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह, ऋषभ पंत, हार्दिक पंड्या, मोहम्मद शामी आणि जखमी केएल राहुल यांना वगळण्यात आले आहे. या सर्व खेळाडूंना विश्रांती दिल्याचे सांगितले गेले आहे. गेल्यावर्षी श्रीलंका दौऱ्यावर धवनने तीन एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व केले होते. तेव्हा इतर वरिष्ठ खेळाडू इंग्लंडमध्ये कसोटी मालिका खेळण्यात व्यग्र होते. वेस्ट इंडीज विरुद्धच्या मालिकेमध्ये ऋतुराज गायकवाड किंवा शुबमन गिल यापैकी एकासोबत धवन सलामीला येताना दिसेल. ऋषभ पंतच्या जागी संजू सॅमसन किंवा ईशान किशन यष्टीरक्षण करताना दिसतील. तर, वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही